महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १८५ वे | दिनांक : ३०/०६/२०२६ | वार : मंगळवार

## TET पेपरफुटीनंतर मोठा निर्णय : राज्यातील सर्व महत्त्वाच्या परीक्षा आता ऑनलाईन; मंत्री दादा भुसेंची विधानसभेत घोषणा



**मुंबई :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पेपरफुटी प्रकरणात भिवंडी पोलिसांनी अत्यंत मोठी कारवाई करत एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. भिवंडीतील कोनगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत टीईटी परीक्षेचे पेपर विक्री करण्यासाठी आलेल्या राजू प्रयाग शाम आणि त्याच्या इतर दोन साथीदारांना पोलिसांनी रंगेहात पकडले. या तिन्ही आरोपींना 27 जून रोजी अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून परीक्षेचे प्रश्नपत्रिका संचदेखील जप्त करण्यात आले आहेत.

हे आरोपी परीक्षार्थींकडून मोठी रक्कम उकळून या प्रश्नपत्रिकांची विक्री करण्याच्या तयारीत होते, मात्र पोलिसांनी वेळीच सापळा रचून त्यांचा हा डाव उधळून लावला. भिवंडी पोलिसांच्या या कारवाईमुळे संपूर्ण शिक्षण क्षेत्रात आणि प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या हजारो परीक्षार्थींमध्ये एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे स्पर्धा परीक्षांच्या सुरक्षिततेचा आणि पारदर्शकतेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने तत्काळ पावले उचलली असून, राज्याचे मंत्री दादा भुसे यांनी विधिमंडळ सभागृहात या संपूर्ण कारवाईची सविस्तर माहिती दिली. तसेच, भविष्यात अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी पुढील टीईटी आणि इतर सर्व महत्त्वाच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याबाबत निर्णय घेण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत करण्यात येत असल्याची महत्त्वपूर्ण घोषणाही दादा भुसे यांनी यावेळी केली.

भिवंडी पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईत टीईटी पेपरफुटी प्रकरणातील बिहार आणि हरियाणा येथील तीन मुख्य आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. अटक करण्यात आलेल्यांमध्ये राजीव प्रयाग शाम (वय 45, रा. पाटणा-बिहार), आकाश कुमार स्वराज कुमार (वय 30, रा. पाटणा-बिहार) आणि धीरज बलराज सिंग (वय 28, रा. पानिपत-हरियाणा) यांचा समावेश आहे. या आरोपींकडून आगामी टीईटी परीक्षेचे चार प्रश्नपत्रिका संच जप्त करण्यात आले असून, हे पेपर विकण्यासाठी तब्बल 1.5 कोटी रुपयांचा मोठा आर्थिक व्यवहार होणार असल्याची धक्कादायक माहिती पोलिसांच्या तपासात उघडकीस आली आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे सभागृहात बोलताना म्हणाले, महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा ही 2026 पेपर फुटीच्या प्रकरणी ठाणे शहर पोलिस आयुक्तालयातील येथील दाखल गुन्हाबाबत निवेदन सादर करत आहे.

दादा भुसे म्हणाले, TET परीक्षा दिनांक 28.06.2026 रोजी होणाऱ्या परीक्षेची प्रश्नपत्रिका काही लोक विक्री करणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सदर माहितीची खातरजमा करून पोलिसांनी सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले. पोलिसांनी अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून TET परीक्षेचे पेपर आढळून आले. शिक्षण विभागाच्या वरिष्ठ आधुकाऱ्यांकडून खात्री केली असता सदर प्रश्नपत्रिका 28 तारखेला होणाऱ्या परीक्षेचे असल्याचे समोर आले.

पुढे बोलताना दादा भुसे म्हणाले, राजू प्रयाग चाव व इतर दोन यांच्याविरोधात दिनांक 27 जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यातील 3 आरोपींना 27 जुलै रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा संवेदनशील असून या दाखल गुन्ह्याचे व्याप्ती लक्षात घेता एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. याचा तपास सध्या सुरू असून बिहारला दोन पथके, हरयाणाला एक पथक दिल्लीला एक पथक रवाना करण्यात आले आहेत. या प्रकरणातील जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर मकोका लावण्यात येणार असल्याची देखील माहिती त्यांनी यावेळी दिली आहे.

## SC उपवर्गीकरणावर सरकारची कोंडी?; २७ आमदारांचे फडणवीसांना पत्र

**मुंबई :** अनुसूचित जाती (SC) आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर महाराष्ट्रातील राजकारण पुन्हा तापले आहे. या निर्णयाविरोधात अनुसूचित जातीच्या २७ आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन तीव्र नाराजी व्यक्त केली असून, उपवर्गीकरणाचा निर्णय घेतल्यास मोठा विरोध केला जाईल, असा स्पष्ट इशारा दिला आहे. याच पार्श्वभूमीवर उद्या (१ जुलै) मुंबईतील विधानभवनावर मोठा मोर्चा काढण्याची तयारी सुरू झाली आहे.

मुख्यमंत्र्यांच्या भेटीदरम्यान २७ आमदारांनी संयुक्तपणे स्वाक्षरी केलेले निवेदन सादर करत सरकारने आरक्षणातील उपवर्गीकरणाचा निर्णय घेऊ नये, अशी मागणी केली. या निर्णयामुळे अनुसूचित जातींमध्ये फूट पडू शकते आणि समाजात संघर्ष निर्माण होण्याची भीती असल्याचे आमदारांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडले. या बैठकीत आमदारांनी न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल सार्वजनिक केल्याशिवाय कोणतीही पुढील कार्यवाही करू नये, अशीही ठाम भूमिका घेतली.

या प्रश्नावर उद्या विधानभवनावर मोठा मोर्चा निघणार असून, त्याचे नेतृत्व आनंदराज आंबेडकर करणार आहेत. या आंदोलनात अनुसूचित जातीतील विविध संघटना आणि या मुद्द्यावर आक्रमक झालेले आमदार सहभागी होणार असल्याची माहिती आहे.

उपवर्गीकरणाच्या प्रस्तावावर नाराजी व्यक्त करताना काही आमदारांनी हा निर्णय म्हणजे "जाती-जातींमध्ये भांडण लावण्याचा प्रयत्न" असल्याचा आरोप केला. त्यामुळे कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व संबंधित घटकांशी व्यापक चर्चा करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, १६ जून रोजी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी या विषयावर महत्त्वाची भूमिका मांडली होती. त्यांनी स्पष्ट केले होते की, अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणासंदर्भात आतापर्यंत एक लाखांहून अधिक हरकती शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. प्रत्येक हरकतीवर सुनावणी झाल्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल.

शिरसाट यांनी कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, अशी ग्वाही देत सांगितले होते की, न्यायमूर्ती बदर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने शासनाला अहवाल सादर केला असून, त्यावर विविध समाजघटकांकडून मोठ्या प्रमाणात हरकती आणि निवेदने आली आहेत. त्यामुळे हरकती दाखल करण्यासाठी मुदतवाढही देण्यात आली असून, सर्व संबंधितांना आपली भूमिका मांडण्याची संधी दिली जाईल. हा विषय अत्यंत संवेदनशील असल्याने सरकार कोणताही निर्णय घाईघाईने घेणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले होते.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नितीन राऊत यांनीही विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करून उपवर्गीकरणाला विरोध दर्शवला आहे. त्यामुळे हा प्रश्न आता केवळ सामाजिक न राहता राजकीयदृष्ट्याही अधिक संवेदनशील बनला आहे.

एकीकडे सरकारकडून सर्व हरकतींवर सुनावणी झाल्यानंतरच निर्णय घेतला जाईल, अशी भूमिका मांडली जात असताना, दुसरीकडे २७ आमदारांचा विरोध, न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल जाहीर करण्याची मागणी आणि विधानभवनावर निघणारा मोर्चा यामुळे महायुती सरकारची कोंडी वाढण्याची चिन्हे आहेत. आता राज्य सरकार पुढे कोणती भूमिका घेते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## देहव्यापार प्रकरणात मराठी अभिनेत्रीची सुटका; गिरगावातील हॉटेलवर पोलिसांचा छापा

**मुंबई :** मुंबईतील गिरगाव परिसरातील एका हॉटेलमध्ये सुरू असलेल्या कथित देहव्यापाराच्या रॅकेटचा मुंबई पोलिसांनी मोठा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत मराठी चित्रपटसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींसह आणखी एका अभिनेत्रीची सुटका करण्यात आली असून, सेलिब्रिटींसोबत काम करणारा मेकअप आर्टिस्ट दलाल म्हणून रंगेहाथ पकडण्यात आला आहे. या कारवाईमुळे मनोरंजन विश्वात एकच खळबळ उडाली आहे.

मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गिरगावातील एका हॉटेलमध्ये देहव्यापार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला. पोलिसांनी प्रथम बनावट ग्राहक पाठवून व्यवहाराची खात्री केली. त्यानंतर छापा टाकत संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला.

छाप्यात दोन महिलांची सुटका करण्यात आली. यापैकी एक अभिनेत्री मराठी चित्रपटांमध्ये प्रमुख भूमिका साकारत आलेली असून ती आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक असल्याचे पोलिसांनी सांगितले. दुसरी अभिनेत्री बंगाली आणि बॉलिवूड चित्रपटांमध्ये कॅमिओ भूमिका करणारी आहे. दोघींची ओळख पोलिसांनी जाणीवपूर्वक गुप्त ठेवली असून, त्यांचे संरक्षण आणि तपासाच्या दृष्टीने कोणतीही माहिती जाहीर करण्यात आलेली नाही.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० जून २०२६


## छत्रपती संभाजीनगर येथे तिफण ट्रेंकिंग ग्रुपतर्फे गणेश टेकडीवर निसर्ग भ्रमंती व स्वच्छता अभियान



**छत्रपती संभाजीनगर :** तिफण ट्रेकिंग ग्रुप व तिफण सखी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने दर रविवारी आयोजित करण्यात येणाऱ्या निसर्ग भ्रमंतीचा उपक्रम याही रविवारी उत्साहात पार पडला. रविवार दि. २८ जून रोजी सकाळी ७ वाजता गणेश टेकडी येथे निसर्ग भ्रमंतीचे आयोजन करण्यात आले होते.या भ्रमंतीदरम्यान सहभागी सदस्यांनी गणेश टेकडी परिसरात पडलेला प्लास्टिक कचरा, पाण्याच्या बाटल्या व इतर घनकचरा गोळा करून स्वच्छता अभियान राबवले. 'निसर्ग अनुभवायचा आणि जपायचाही' हा संदेश देत टेकडी परिसर स्वच्छ करण्यात आला.निसर्ग भ्रमंतीनंतर टेकडीच्या माथ्यावर सामुदायिक योगाभ्यासही घेण्यात आला. मोकळ्या हवेत, निसर्गाच्या सान्निध्यात योगा करताना सर्व सदस्यांनी शारीरिक व मानसिक ताजेपणा अनुभवला. या उपक्रमात सहभागी झालेल्या नागरिकांनी निसर्गाच्या कुशीत मनमुराद आनंद लुटला. यावेळी पर्यावरण व निसर्ग संवर्धन याविषयी जनजागृती करण्यात आली. प्लास्टिकचा वापर टाळणे, झाडे लावणे, जलसंधारण करणे यासारख्या विषयांवर चर्चा झाली.छत्रपती संभाजीनगर परिसरातील निसर्गस्थळांना भेटी देऊन तिथली स्वच्छता करणे व पर्यावरण रक्षणाचा संदेश देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. दर रविवारी वेगवेगळ्या ठिकाणी अशा प्रकारे निसर्ग भ्रमंती आयोजित करण्यात येते, अशी माहिती तिफण ट्रेकिंग ग्रुपच्या आयोजकांनी दिली. निसर्ग, आरोग्य आणि स्वच्छता यांची सांगड घालणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे. या उपक्रमात तिफन सखी मंचचे मार्गदर्शक डॉ. शिवाजी हुसे, कैलास मुगले, प्रभाकर मुंढे, विलास कापडे, सोमनाथ ताठे,सतीश ताठे,अनिल ताठे, हरिदास पाले, उर्मिला हुसे, प्रतिभा ताठे, वैशाली कापडे, योगेश्वरी मुंढे, अनुसया मुगले, कल्पना पाले, शामल ताठे, सांची ताठे,उन्नती ताठे आदींची उपस्थिती होती.

## बसव प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हा परिषद, केंद्रीय प्राथमिक शाळेत २२० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** बसव प्रतिष्ठान अखिल भारतीय सामाजिक संघटनेच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव २०२६ चे औचित्य साधून मुरूम येथील जिल्हा परिषद प्रशालेत ५ वी ते ८ वीच्या १७० व केंद्रीय प्राथमिक शाळेतील ५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे समाजसेवक तथा अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषद शाळेचे मुख्यध्यापक विजयकुमार देशमाने, विलास कंटेकुरे,केंद्रीय प्राथमिक शाळा मुख्यध्यापक अशोक बोईनवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. पुराणे म्हणाले ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण क्षेत्रात मागे राहू नये, आपला परिसर कृषी प्रधान परिसर असून शाळेतील प्रत्येक विद्यार्थी हा गरजू विद्यार्थी असतो तसेच समाजाने जी देणगी आम्हाला दिली ती देणगी समाजापर्यंत प्रामाणिक पोहचवणाची जबाबदारी ही सामाजिक संघटनेची असते आणि ती जबाबदारी पार पाडण्याचा पारदर्शक प्रयत्न करत असून शालेय साहित्यविना विद्यार्थी शिक्षणापासून वंचीत राहू नये यासाठी बसव प्रतिष्ठानच्या माध्यमातून शैक्षणिक उपक्रम हाती घेतला आहे. यावेळी शिवाजी कवाळे,संतोष कडगंचे,हरिभाऊ माकणे,गणपत पाटील,मोहन राठोड,श्रीमती बिना पोद्दार,श्रीमती संगीता डोकडे,श्रीमती सुनंदा हुल्ले, श्रीमती अल्कादेवी गायकवाड,राजू पवार,नागनाथ कामशेट्टी आदीसह पालक उपस्थित होते.

## भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा अमृत महोत्सवी वर्धापन दिन उत्साहात साजरा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** श्री संचारेश्वर प्राथमिक विद्यालय जिंतूर येथे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा ७५ वा वर्धापन दिन 28 जून रोजी संपन्न झाला संस्थेच्या प्रांगणात उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे स्थानिक अध्यक्ष महालिंगआप्पा कुरे यांच्या हस्ते संस्था ध्वजाचे ध्वजारोहणाने झाली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेक मुक्कावार यांनी केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा स्थानिक कार्यवाह रविकुमार पेशकार यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. आणि शिक्षणाचे महत्व सांगितले. ते म्हणाले, "भारतीय शिक्षण प्रसारक संस्था नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्नशील आहे. संस्थेने आतापर्यंत हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश पोहोचवला आहे." आणि हे ईश्वरी कार्य ईथुन पुढे ही असेच अविरत सुरू राहील.असे मत व्यक्त केले.मुख्याध्यापिका श्रीमती सुमती भारती यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महालिंगआप्पा कुरे,तर प्रमुख पाहुणे कार्यवाह रवीकुमार पेशकार,उपाध्यक्ष किरणजी वट्टमवार, सरस्वती विद्यालयाचे अध्यक्ष हनुमंतजी भालेराव,शालेय समिती अध्यक्ष वसंतराव पुराणीक, भास्करराव अंबरवाडीकर, विभाग सहकार्यवाह उपेंद्र कौडगावकर, तालुका संघचालक सुरेशकाका ठोंबरे, उल्हासजी जिंतूरकर, प्रसादजी खेर्डेकर,ललितजी देव,चंद्रकांत वसेकर,सौ.मीराताई खापरखुंटीकर, सौ.संगीताताई जिंतूरकर,प्राथमिक मुख्याध्यापिका सुमती भारती, माध्यमिक मुख्याध्यापक प्रभाकर नांदेडकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब ठोंबरे यांनी केले तर आभार प्रदर्शन मोनिका घोडके यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्कार केंद्रातील सर्व शिक्षक वृंद शिवाजी सोमोसे,किरण नाईक,उषा खराबे,रुपाली सोनसळे, बाळासाहेब ठोंबरे,विवेक मुक्कावार, प्रल्हाद वैरागर,कृष्णा मुसळे,गजानन घुगे,कपिल घुगे,दिनकर चिलगर,अंजली ठोंबरे,मनिषा धाबेवार, अश्विनी पांडे,मोनिका घोडके व शिक्षकेतर कर्मचारी पुजा बुधवंत,परिश्रम घेतले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० जून २०२६


## शहराचे नागरिक हेच वारसास्थळांचे ब्रँड ॲम्बेसेडर



**छत्रपती संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर शहरातील औरंगाबाद लेणी ही अत्यंत महत्त्वाची लेणी आहे. जगातील दोन अद्भुत शिल्प इथल्या लेणी क्रमांक सातमध्ये बघायला मिळतात. दुर्दैवाने या जगविख्यात वारसास्थळाची माहिती आपणच ठेवत नाही. शहराचे नागरिक, लहान मुल ही सुद्धा वारसास्थळांचे ब्रँड ॲम्बेसेडर असतात. आपणच आपल्या लेणीची माहिती इतरांना द्यायला हवी, असे आवाहन मुर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे सचिव डॉ. संजय पाईकराव यांनी केले.शहरातील 'शहरनामा' टीमने रविवारी आपला दुसरा हेरिटेज वॉक व फोटो वॉक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाजवळ असलेल्या औरंगाबाद लेणी समूहातील क्रमांक ६ ते १० येथे घेतला. इतिहास व पुरातत्व विभाग, एमजीएम विद्यापीठ, आख्यान फाऊंडेशन, गरवारे कम्युनिटी सेंटर, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर ईस्ट आणि अँडगाइड मीडिया प्रा. लि. व भारत पर्यटन, पर्यटन मंत्रालय, भारत सरकार यांनी मिळून हा उपक्रम घेतला. यावेळी गरवारे कम्युनिटी सेंटरचे संचालक सुनील सुतवणे, एमजीएम विद्यापीठाच्या इतिहास व पुरातत्व विभागाचे सहाय्यक प्रा. आशुतोष पाटील, अँडगाइड मीडियाचे ओम परदेशी, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर ईस्टचे अध्यक्ष निवृत्ती गजभारे, भारत पर्यटन विभागाच्या वरिष्ठ अधिकारी स्नेहल पाटील उपस्थित होत्या. डॉ. संजय पाईकराव यांनी औरंगाबाद लेणीचा इतिहास, कला, स्थापत्य आणि पुरातत्त्वीय वैशिष्ट्ये याकडे लक्ष वेधले. वारसा स्थळे समजून घेण्यासाठी त्यांच्या प्रेमात पडायला हवे. कलासक्त दृष्टीने बघितले तर औरंगाबाद लेणीतील शिल्प बोलकी वाटतात. औरंगाबाद लेणीचा उल्लेख कान्हेरीच्या लेण्यात येतो. या लेणीचा कालखंड साधारणपणे सहावे ते आठवे शतक सांगितला जातो. बेसॉल्टमधले हे शिल्प वैभव वरून खाली कोरण्यात आले. शिल्पातील आभूषणे, केशरचना अत्यंत कोरीव आहे. या लेणीतील काही शिल्प अजिंठ्याच्या शिल्पापेक्षाही सुंदर असल्याचे अभ्यासक म्हणतात. यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो तो लेणी क्रमांक सातमध्ये 'अवलोकितेश्वर बोधिसत्व ' हे शिल्प. यामध्ये 'अष्टभयां'पासून अवलोकितेश्र वर बोधिसत्व रक्षण करतात अशी मान्यता आहे. अजिंठा, कान्हेरी, वेरूळ लेणींमधल्या अवलोकितेश्र वरांपेक्षाही औरंगाबाद लेणीतील अवलोकितेश्वराचे शिल्प सर्वोत्तम मानले जाते. याच लेणीतील 'राजनर्तिका नृत्यशिल्पपट' म्हणून प्रसिद्ध आहे. या शिल्पाकृतीकडे अभ्यासक आकर्षित होत असून हे शिल्प अत्यंत प्रभावी व स्त्री स्वातंत्र्याला अभिव्यक्त करणारे आहे, लेणी क्र. 6 च्या आधी एक लेणीचा शोध ६० घ्या दशकात डॉ. रमेश गुप्ते यांनी लावला. यास गणपती लेणी म्हटले जाते, असे संजय पाईकराव म्हणाले. शहरनामाच्या पहिल्या फोटो वॉकच्या विजेत्या मिनल निकम यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. तसेच सुधीर कोर्टीकर यांनी वेगवेगळ्या पक्ष्यांचे आवाज काढून दाखवले.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात संत कबीर जयंती साजरी



**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे)** : उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात संत कबीर यांची जयंती विद्यार्थी आणि शिक्षका समवेत मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आली. संत कबीर हे केवळ कवी, लेखक नसून एक दृष्टे समाजसुधारक होते, वैज्ञानिक दृष्टी असलेले परिवर्तनवादी होते. त्याकाळात त्यांनी आपल्या विद्रोही विचारांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. असे सांगून या कार्यक्रमाचे मुख्य प्रवक्ते प्रा. डॉ. बालाजी कोनाळे यांनी आपल्या भाषणात पंधराव्या शतकातील एक महान संत, धर्म, जात आणि अंधश्रद्धेवर कठोर प्रहार करून त्यांनी समाजाला मानवतेचा आणि भक्तीचा संदेश दिल्याचे सांगितले. निर्गुण भक्ती, समाजसुधारणा, अभिजात साहित्य यामुळे आजही त्यांची जनमानसात अलौकिक अशी प्रतिमा आहे. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. गुलाब राठोड, प्रा. डॉ. महादेव खोत, प्रा. डॉ. रमेश मांदळे उपस्थित होते. संत कबीर यांच्या प्रतिमा पूजनानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि अध्यक्षीय समारोपानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## बसव प्रतिष्ठाच्या वतीने जिल्हा परिषद स्पेशल शाळेत १३३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : बसव प्रतिष्ठाण अखिल भारतीय सामाजिक संघटनेच्या वतीने दि. २९ वार सोमवार रोजी महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव २०२६ औचित्य साधुन मुरूम भीम नगर येथील जिल्हा परिषद स्पेशल शाळेतील १ ते ७विच्या १३३ विद्यार्थ्यांना शाळे साठी लागणाऱ्या स्कूल बॅग, वॉटर बॉटल सहित सर्व शालेय साहित्याचे समाजसेवक डॉ.रामलिंग पुराणे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे ४ आणि ७ वी स्पर्धा परीक्षा साठी लागणारे पुस्तक, डिक्सनरी सेट ही शाळेसाठी देण्यात आले. याप्रसंगी विजयकुमार देशमाने, विलास कंटेकुरे,बसव प्रतिष्ठाण अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे आदींची प्रमुख उपस्थिती होती उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आला. अनेक गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पासून वंचित असतात आणि त्यामुळे ते शिक्षणापासून दूर जायला लागतात अशा विद्यार्थ्यांना पाठबळ मिळावे या उद्दात हेतूने बसव प्रतिष्ठाण च्या माध्यमातून सातत्याने शालेय उपयोगी कार्यक्रम राबविले जातात आणि त्याचाच एक भाग म्हणून आज विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले असल्याचे मत अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी मांडले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निर्मलकुमार लिमये,आनंद कांबळे, मुख्यध्यापिका तुपेरे मॅडम,रुपचंद ख्याडे सर , शिवाजी गायकवाड सर , थिटे सर आदिंची उपस्थिती होती.

## वटपौर्णिमेनिमित्त बहिरगाव जिल्हा परिषद प्रशालेत वटवृक्षाचे रोपण




**कन्नड (अरुण थोरात)** : वटपौर्णिमेच्या निमित्ताने जिल्हा परिषद प्रशाला, बहिरगाव येथे सामाजिक वनीकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, कन्नड व जिल्हा परिषद प्रशाला, बहिरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.इको क्लब अंतर्गत आयोजित या उपक्रमामध्ये ऑक्सिजन देणाऱ्या वडाच्या वृक्षाचे रोपण करण्यात आले. यावेळी वनरक्षक संध्या खाडे तसेच गावातील महिलांच्या हस्ते वडाच्या रोपाचे विधिवत रोपण करण्यात आले. उपस्थितांनी पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि वृक्ष संगोपनाचा संकल्प केला.यावेळी वृक्षारोपणाचे महत्त्व, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षांची आवश्यकता आणि प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण झाली असून परिसर अधिक हिरवागार करण्याच्या दिशेने हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.कार्यक्रमास प्रशालेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप, इको क्लब प्रमुख कलाशिक्षक सलीम अत्तार, तसेच शिक्षक दिलीप महाजन, कुलभूषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नूतन पवार, श्याम खोसरे, किरण पाटील, राधेश्याम शर्मा, स्वप्नील गंगुर्डे, गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, किसनाबाई गोरे उपस्थित होते. तसेच सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी-कर्मचारी, गावातील महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० जून २०२६

# पाऊस आला

पाऊस आला
व्याकूळ धरतीवरी
निसर्ग घडवितो
किमया न्यारी

टप् टप् पडती
भुईवर गारा
भुरळ घाली
शितल वारा

चहू बाजूंनी
मेघ बरसती
धुंद होऊनी
मुले नाचती

बहरली लता वेली
बहरली रानफुले
चातक पक्षी
आनंदाने डुले

हिरवाईने
नटले रान
धुंदीत पाखरे
गाती गान

पाऊस पडतो
रानावनात
चैतन्य फुलवी
मनामनात



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

# जीवन एक रंगमंच

मनातले मनात सारे दडपून,
चारचौघात बसावे लागते.
कितीही दु:खी असले तरी,
चारचौघात हसावे लागते.

मित्रांनो जीवन एक रंगमंच आहे,
प्रत्येकाला नाटक करावे लागते.
दु:ख सारे अंतर्मनात लपवून,
मुखावर हास्य खुलवावे लागते.

जीवनाच्या रंगमंचावर सर्वांना,
हसण्याचे नाटक करावे लागते.
मनातला हल्लकल्लोळ दडपून,
सुखी असल्याचे भासवावे लागते.

कोणी नाही कुणाचा या स्वार्थी जगात,
स्वत:च स्वत:ला सिद्ध करावे लागते.
जीवनातले दु:ख सारे दूर करून,
स्वत:च स्वत:ला सावरावे लागते.

जीवनात सुख दु:खाला सोबत घेऊन,
जगतांना संघर्ष करावेच लागते.
सुखदु:खाच्या सागरातून प्रत्येकाला,
नाटक करतच प्रवास करावे लागते.



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्काराने कु. लाव्या वाघमारे सन्मानित




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवानिमित्त बसव प्रतिष्ठान, मुरूम यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १२ व्या राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार वितरण सोहळ्यात विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. याच सोहळ्यात क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत गुरुकुल प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल, मुरूम येथील गुणवंत विद्यार्थिनी कु. लाव्या नागनाथ वाघमारे हिला प्रतिष्ठेचा *राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार*प्रदान करून सन्मानित करण्यात आले.कु. लाव्या नागनाथ वाघमारे ही सध्या गुरुकुल प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल, मुरूम येथे शिक्षण घेत असून, येथे नियमितपणे लाठी-काठी, कराटे तसेच इतर पारंपरिक क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण घेत आहे. लहान वयातच तिने कठोर परिश्रम, नियमित सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि जिद्दीच्या जोरावर क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले असून, तिच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत बसव प्रतिष्ठानने तिला या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविले.पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ प्रदान करून पुरस्कारार्थींचा गौरव करण्यात आला. विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, पालक आणि नागरिकांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.कु. लाव्या हिच्या या यशाबद्दल गुरुकुल प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल, मुरूम यांच्या मुख्याध्यापिका सौ. मयुरी चौधरी तसेच संचालक श्री. आनंद चौधरी यांनी तिचे मन:पूर्वक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व क्रीडा वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच क्रीडा, व्यक्तिमत्त्व विकास आणि स्वसंरक्षण प्रशिक्षणालाही तितकेच महत्त्व देण्याची शाळेची भूमिका असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.अमन स्पोर्ट्स क्लब, उमरगा यांच्या वतीनेही कु. लाव्या हिच्या या यशाचे कौतुक करण्यात आले. प्रशिक्षक महमदरफी शेख यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांमध्ये असलेली क्षमता योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि पालकांच्या सहकार्यामुळेच विकसित होते. कु. लाव्या हिचे यश हे मेहनत, चिकाटी आणि समर्पणाचे प्रेरणादायी उदाहरण असून, प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी आहे."कु. लाव्या नागनाथ वाघमारे हिच्या या यशामुळे गुरुकुल प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल, मुरूम, अमन स्पोर्ट्स क्लब, उमरगा, तिचे पालक तसेच संपूर्ण मुरूम व उमरगा परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही ती राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करून महाराष्ट्रासह भारताचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.कु. लाव्या नागनाथ वाघमारे हिचा हा सन्मान केवळ एका विद्यार्थिनीच्या यशाचा गौरव नसून, योग्य शिक्षण, गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, पालकांचा विश्वास आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या एकत्रित प्रयत्नांचे यशस्वी फलित आहे. तिची ही यशोगाथा इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, प्रत्येक पालक आणि विद्यार्थ्याला मोठी स्वप्ने पाहण्याची व ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करण्याची प्रेरणा देणारी आहे.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

जाहिरात दर
१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० जून २०२६

## भूमी अभिलेख कार्यालयाचा अजब कारभार सरकारी खुर्चीवर खाजगी व्यक्ती विराजमान



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** जिंतुर शहरातील तहसील कार्यालयाच्या आवारात असलेल्या भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी बे जबाबदार पणाचा कळस गाठला असून यांना म्हणे कार्यालयीन कामासाठी पाच दिवस पुरेना म्हणून रविवारी सुट्टीच्या दिवशीही चक्क कार्यालय उघडून सरकारी खुर्चीवर खाजगी माणूस बसवून कसलेतरी कामे करत बसल्याचे पत्रकारांना आढळून आले या बाबत जाब विचारताच खाजगी इसमानी पळ काढला तर जगताप यांच्या सोबतच्या खाजगी इसमाने कार्यालयास कुलूप लावले ही घटना रविवार दि 28 जून रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली याबाबत अधिक माहिती अशी की शहरातील भूमी अभिलेख कार्यालय नेहमीच या ना त्या कारणाने चर्चेत असते या कार्यालयास प्रभारी अधिकारी असल्याने व ते कार्यालयाकडे जास्त लक्ष देत नसल्याने कर्मचाऱ्यांची मनमानी वाढली असून कर्मचारी कामानिमित्त कार्यालयात आलेल्या शेतकरी,नागरिकांना उद्धट भाषेत बोलत असल्याच्या असंख्य तक्रारी आहेत.काही दिवस अगोदर शहरातील एक विधिज्ञानेही या कार्याल्याचा व्हिडीओ बनवून समाज माध्यमावर टाकले होते त्यामुळे या विभागाच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली होती.गेलेली अब्रू परत मिळवण्यासाठी कार्यालयातील एका प्रमुख अधिकाऱ्याने सगळ्या कर्मचाऱ्यांना वेठीस धरून त्या विधिज्ञ विरुद्ध महसूल व पोलीस स्थानकात निवेदन देण्यास भाग पाडले असे असले तरीही हे कर्मचारी किती निष्ठेने नागरिक व शेतकऱ्यांचे कामे करतात हे संपूर्ण तालुक्यातील जनतेला माहीत आहे रविवार दि 28 जून रोजी दुपारी एक वाजल्यापासून भूमी अभिलेख कार्यालय उघडे असल्याची माहिती पत्रकारांना मिळाली त्यावरून दोन वाजण्याच्या सुमारास शहरातील काही पत्रकार बांधव कार्यालयात गेले असता त्या ठिकाणी भु मापक प्रकाश जगताप यांच्या बाजूच्या सरकारी खुर्चीवर हिंगोली येथील खाजगी व्यक्ती प्रमोद देशमुख हे बसून लॅपटॉप वर कसलेतरी काम करतांना दिसून आले तर टेबल च्या दुसऱ्या बाजूला जगताप यांचे आणखीन एक मित्र काळे हे आणि कार्यालयातून बदलुन गेलेले प्रधान हे ही खुर्चीवर बसलेले आढळून आले या वेळी पत्रकारांनी स्वतःचा परिचय देत जगताप यांना सरकारी टेबल खुर्चीवर खाजगी माणूस बसून काय करतो...? असे प्रश्न विचारताच ते मला मदत करायला आले जगताप म्हणाले.कोणत्या नागरिकांचे सरकारी काम सुट्टीच्या दिवशी आपण करत आहात असे प्रश्न विचारताच खाजगी व्यक्ती प्रमोद पाटील यांनी लॅपटॉप बंद केला व आम्ही सहज बसलो होतो असे म्हणून वेळ निभावून नेण्याचा प्रयत्न केला पत्रकारांनी व्हिडीओ शूटिंग सुरू करताच प्रमोद देशमुख,प्रधान यांनी कार्यालयातून पोबारा केला तर जगताप म्हणाले की आम्हाला कामासाठी पाच दिवस पुरत नसल्याने आम्ही सुट्टीच्या दिवशी काम करीत बसलो होतो तर पत्रकार आल्यानंतर आपण काम का बंद केले असे विचारताच लघुशंकेचे कारण दाखवत जगताप यांनीही कार्यालयातून काढता पाय घेतला व खाजगी व्यक्ती काळे यांनी भूमी अभिलेख कार्यालयाच्या दाराला कुलूप लावले त्यामुळे या कार्यालयाची चावी खाजगी व्यक्ती कडे कशी असा प्रश्नही उपस्थित होत आहे चौकट अभिलेखे कक्ष ही उघडाच संपूर्ण तालुक्यातील जमिनीचे दस्तावेज असलेला महत्वपूर्ण अभिलेख कक्षाचे दार ही रविवारी सताड उघडे दिसले या बाबत विचारले असता जगताप म्हणाले की त्या कक्षाची चावी टेबलावरच पडलेली असते चौकट लाईट,पँखेही चालूच जगताप व त्यांच्या सोबतच्या तीन खाजगी व्यक्ती ह्या एकाच टेबलवर समोरासमोर बसून काम करत असताना संपूर्ण कार्यालयातील पंखे,ट्युबलाईट सुरू होत्या आणि जगताप हे लघुशंके साठी कार्यल्याबाहेरील मोकळ्या जागेत जाऊन मोकळे होऊन आले त्यामुळे मोदींच्या स्वच्छ भारत मिशनला सरकारी कर्मचारीच हरताळ फास्ट असल्याचे दिसून आले चौकट, चौकशी करतो;- उपअधीक्षक गोरे या सर्व प्रकारा बाबत प्रभारी भूमी उपअधीक्षक गोरे यांच्याशी भ्रमध्वनी द्वारे संपर्क साधला असता ते म्हणाले की काम असल्याने सुट्टीच्या दिवशी कार्यालय उघडले असेल परंतु सरकारी टेबल खुर्चीवर बसून खाजगी व्यक्ती लॅपटॉप का हाताळतेय..? या प्रश्नाचे उत्तर देणे टाळत त्यांनी चौकशी करून सांगतो असे म्हणाले

## सेवानिवृत्त होताना

एका संस्कृत सुभाषितकाराने म्हटलं आहे की जो लिहितो वाचतो पंडितांचा आश्रय घेतो त्याची बुद्धी सूर्यकिरणाने विकसित होणाऱ्या कमळ पुष्पातील दवबिंदूप्रमाणे विकसित होते अतिशय योग्य आणि व्यापक कल्पना आहे ही आज आपल्या सर्वांच्या लाडक्या शिक्षिका पर्यवेक्षक आदरणीय डॉ सीमा पाटील चौधरी मॅडम सेवानिवृत्त होत आहे त्यानिमित्त त्यांच्याविषयी असलेल्या भावना व्यक्त करण्याची संधी मला मिळाली याचा कृतार्थ अभिमान मला वाटतो एक विद्यार्थी प्रिय शिक्षिका म्हणून त्यांचा नावलौकिक आहे आज मतीला त्यांच्या हाताखालून अनेक विद्यार्थी अनेक क्षेत्रात आपले नाव आजमावत आहे एक विद्यार्थी प्रिय शिक्षिका असा त्यांचा परिचय गेले चार दशक मी मॅडमच्या सहवासात असून माझ्या जडणघडणीत त्यांचा फार मोठा वाटा आहे अल्पपरिचय डॉ सीमा चौधरी मॅडम पूर्वीच्या मराठवाडा (आताचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) विद्यापीठातील जेष्ठ भौतिकशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ प्रभाकर पाटील यांच्या जेष्ठ कन्या भौतिकशास्त्राची पाळमुळच जणू त्यांच्या बालपणापासूनच त्यांच्यावर रुजली गेली ऑक्टोबर १९९३ ते जून २०२६ पर्यंत त्या देवगिरी महाविद्यालयात अखंड ज्ञानदानाचे कार्य करत आहे Dielectric Rleaxation Study मध्ये त्यांना १९९७ वर्षी विद्यावाचस्पती ही पदवी प्राप्त झाली त्यांनी Fundamental of Physics, Advanced Physics, Concept of Physics या रेणुका पब्लिकेशनच्या प्रसिद्ध झालेल्या पुस्तकातून Co Auother म्हणून लिखाण केले आहे सामाजिक बांधिलकी चे भान असलेली विद्यार्थी प्रिय शिक्षिका:_सन १९९७ ला मी देवगिरी महाविद्यालयात अकरावी इयत्तेत प्रवेश घेतला त्यावेळेला मॅडम माझ्या वर्ग शिक्षिका होत्या तेव्हा देवगिरी महाविद्यालयाच्या जुन्या इमारतीत २० नंबर हॉलमध्ये तब्बल २०० विद्यार्थ्यांची तासिका मॅडम कणखर आवाजात विषयाची व्याप्ती समजून अतिशय लाजवाब पद्धतीने उत्कृष्टपणे घेत असत पुढे याच महाविद्यालयात बीएससी चालू असताना मॅडमची आणि माझी अधून मधून भेट होत असत त्या दरम्यान देखील त्या विषयासंदर्भात मार्गदर्शन पर बोलत असत बीएससी झाल्यानंतर एमएससी प्रथम वर्षासाठी मॅडम पुन्हा mathematical Physics हा विषय शिकवण्यासाठी आल्या अतिशय अवघड विषय मॅडमनी यथोचित मांडणी करून शिकवला आणि सहज सुलभ झाला अशाप्रकारे मॅडम च्या सहवासात माझे अकरावी ते एम एस सी पर्यंत सात वर्ष शिक्षण देवगिरी महाविद्यालयात यथोचितपणे पूर्ण झाले त्यानंतर व्यावसायिक पात्रता पूर्ण करून २०१२ मध्ये मी शिवछत्रपती महाविद्यालयात रुजू झाले त्यावेळी भौतिकशास्त्र विषयाच्या पेपरचे मूल्यांकन करताना मी परीक्षक असताना मॅडम माझ्या नियमक असायचा असा हा आमचा प्रवास पुन्हा सुरू झाला आणि पुन्हा गुरु-शिष्याचे नाते अधिक दृढ झाली पुढे बदली रूपाने मी देवगिरी महाविद्यालयात रुजू झाले आणि मॅडम आणि माझे नाते मैत्रीच्या रूपात बदलले गेले अशा या बहुआयामी अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेल्या माझ्या प्रेरणादायी शिक्षिका दिनांक 30 जून २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहे अशा माझ्या शिक्षिकेस पुढील आयुष्य सुखा समाधानच आणि समृद्धीचे जावो हीच मी परमेश्वरचरणी प्रार्थना करते मॅडम तुम्ही एक आमच्यासाठी शिक्षिकाच नव्हत्या तर प्रत्येक विद्यार्थिनीला समजून घेणाऱ्या योग्य मार्ग दाखवणाऱ्या अशा आदर्श व्यक्तिमत्व आहात तुम्ही आमच्यावर चांगले संस्कार केले शिस्त आत्मविश्वास प्रामाणिकपणा जीवनात कोणत्या गोष्टीला संकटाला धैर्याने सामोरे जाण्याची शिकवण दिली एखादी चूक झाली तर ती गोष्ट रागवून सांगण्यापेक्षा व्यवस्थित यथोचितपणे तुम्ही ती मांडून आमचे शंका समाधान दूर करण्याचा प्रयत्न करून ते सिद्धी जाऊ पर्यंत ठामपणे उभे राहायच्या आज आपण निवृत्त होत आहात कंठ दाटून येत आहेत परंतु ज्यांनी ज्ञान संस्कार प्रेरणा याचे प्रतिबिंब आपल्या विद्यार्थ्यांच्या मनात रुजवले तो शिक्षक कधीही विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सेवानिवृत्त होत नाही त्याचे स्थान विद्यार्थ्यांच्या मनात हृदयात सदैव एक कोपरा म्हणून सामावलेले असते आपण सदैव हसत रहा आपल्या सहवास आम्हाला अजून मिळू दे अनेकांना मिळू दे मॅडम आपल्या पुढील वाटचालीस आपल्या लाडक्या विद्यार्थीकडून आणि तुम्ही आमच्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल मनस्वी शुभेच्छा धन्यवाद.



**- प्रा. स्वाती उगले**
**भौतिकशास्त्र विभाग**
**देवगिरी महाविद्यालय**
**छत्रपती संभाजीनगर**

### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० जून २०२६


## कर्जमुक्ती प्रक्रियेला वेग : पात्र शेतकऱ्यांचा तपशील संकलनाची जबाबदारी बँकांवर निश्चित

राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी “पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना” जाहीर केली असून या योजनेचा लाभ ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांच्या या योजनेमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे.राज्यातील शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार विभागाने कंबर कसली आहे. या योजनेची प्रभावी, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत लाभ देण्यासाठी सर्व व्यापारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सहकार विभागाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. योजनेचा लाभ थेट आणि पारदर्शक पद्धतीने पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी बँकांकडून शेतकऱ्यांचा सविस्तर तपशील मागवण्यात येत आहे. बँकांना युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून बँकांना मुख्यालय आणि जिल्हा स्तरावर विशेष नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनांनुसार पात्र शेतकऱ्यांची माहिती अचूक स्वरूपात संकलित करून पोर्टलवर अपलोड करण्यासह प्रत्येक टप्प्यावर समन्वयाची जबाबदारी बँकांवर निश्चित करण्यात आली आहे. यासाठी प्रत्येक बँकेने मुख्यालय स्तरावर दोन नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापैकी एक अधिकारी योजना अंमलबजावणी समन्वयक, तर दुसरा माहिती तंत्रज्ञान समन्वयक म्हणून काम पाहणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जिल्हास्तरीय समिती (DLC) यांच्याशी समन्वय राखण्यासाठी स्वतंत्र जिल्हा नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कर्जखात्यांचे दोन स्वतंत्र गट करण्यात आले आहेत. आधार क्रमांक उपलब्ध असलेली कर्जखाती आणि आधार क्रमांक उपलब्ध नसलेली कर्जखाती. ज्या खात्यांमध्ये आधार क्रमांक उपलब्ध नाही, अशा खात्यांची स्वतंत्र यादी तयार करून ती बँक शाखा, विकास संस्था तसेच गावपातळीवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित शेतकऱ्यांना विविध माध्यमातून मोहीम राबवून शेतकऱ्यांचा आधार क्रमांक प्रमाणीकरण करण्याचे आवाहन केले जात आहे. यासाठी बँकांनी विशेष आधार-जोडणी मोहीम राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. आधार क्रमांक उपलब्ध असलेल्या कर्जखात्यांची माहिती शासनाने दिलेल्या नमुन्यानुसार तयार करून पोर्टल तातडीने अपलोड करावी लागणार आहे. दि३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली वैयक्तिक व संयुक्त पीककर्ज खाती यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत. संयुक्त कर्जखात्यांसाठी सर्व कर्जदारांचे आधार क्रमांक, आधार-जोडलेली बचत खाती तसेच प्रत्येकाचा कर्जातील हिस्सा नमूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मयत कर्जदारांच्या प्रकरणांमध्ये वारसांची नोंद करून त्यानुसार लाभ वितरित करण्यात येणार आहे. कर्जखात्यांची माहिती अपलोड करताना पोर्टलवरील निकषांचे पालन करणे आवश्यक राहील. त्रुटी आढळल्यास माहिती दुरुस्त करून पुन्हा अपलोड करावी लागणार आहे. आधार क्रमांक असलेल्या खात्यांची माहिती प्रथम अपलोड केली जाईल, तर नंतर आधार जोडणी झालेल्या खात्यांची माहिती पुढील टप्प्यांत स्वीकारली जाणार आहे. माहितीची संगणकीय पडताळणी झाल्यानंतर गावनिहाय लाभार्थी यादी पोर्टलवर उपलब्ध होईल. ही यादी बँक शाखा व विकास संस्थांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणासाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा संबंधित बँक शाखेत उपस्थित राहण्याबाबत संदेश पाठविण्यात येईल. शेतकऱ्यांना यादीतील माहितीबाबत हरकत असल्यास ती थेट जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे पाठविली जाईल. समितीच्या निर्णयानुसार संबंधित बँकांनी आवश्यक दुरुस्त्या करून माहिती अद्ययावत करणे बंधनकारक राहील. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर व्यापारी बँकांच्या लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम थेट जमा केली जाईल. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ४८ तासांच्या आत संबंधित नोंदी अद्ययावत करून पोर्टलवर माहिती नोंदविणे आवश्यक राहील. कर्जमाफीची रक्कम जमा झाल्यानंतर सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेमुळे पात्र शेतकऱ्यांची अचूक ओळख, माहितीची पारदर्शक पडताळणी, तक्रार निवारणाची प्रभावी व्यवस्था आणि कर्जमाफीचा लाभ वेळेत पोहोचविणे शक्य होणार आहे या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाची माफी करण्यात येणार आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित कर्जांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपेक्षा किंचित अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळावा यासाठी विशेष तरतूद करण्यात आली असून शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासन दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा करणार आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र करण्यात आले आहे.एकवेळ समजोता योजना (वन टाईम सेटलमेंट) प्रकरणांबाबतही शासनाने दिलासादायक निर्णय घेतला असून व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि सहकारी बँकांमधील पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.अॅग्रीस्टॅकमध्ये नाव नसल्यामुळे कोणताही शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही प्रथम नोंदणी करून त्यानंतर लाभ दिला जाणार आहे . आवश्यकतेनुसार विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांचा डेटा विशेष पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांना यादीत स्वतंत्र युनिक क्रमांक देण्यात येणार असून ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच ऑनलाइन पोर्टलवर यादी प्रसिद्ध करण्यात येणार . आधार प्रमाणीकरण आणि मोबाईल क्रमांक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकरी बांधवांच्या कर्जखात्यात रक्कम जमा केली जाणार आहे .लवकरच थकबाकीदार शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याचा शासनाचा प्रयत्न असून त्यामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यास मदत होईल,या योजनेचा उद्देश केवळ कर्जमुक्ती देणे नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आहे.



**- भगवंत पाळवदे,**
**अंबाजोगाई, बीड**

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची उपक्रम



**बीड (भगवंत पाळवदे)** : आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे 'चरण सेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.चरण सेवेकरिता समन्वयवारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'चरण सेवा' उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील.३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाद्वारे मालिशआषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत.या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.८ आरोग्य रथाद्वारे जनजागृतीचरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.गतवर्षी राबविण्यात आलेल्या 'चरण सेवा' उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता. यंदाही अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत चरण सेवा, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य जनजागृती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची''भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित 'चरण सेवा' हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकारातून जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पायी प्रवास अधिक सुरक्षित, सुदृढ आणि सुखकर होण्यास मोठी मदत होणार आहे.मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख तसेच पालखी मार्गावरील नागरिकांना 'चरणसेवा' आणि आरोग्य जनजागृती उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.चरणसेवा म्हणजे काय?संत तुकाराम महाराजांनी "तुज मागणें तें देवा, आम्हां तुझी चरण सेवा" या अभंगातून चरण सेवेचे महत्व अधोरेखित केले आहे. त्याच सेवाभावातून प्रेरणा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'चरण सेवा' उपक्रम गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्ष आहे.आषाढी वारीत अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायावर मोठा ताण येत असल्याने त्यांना औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, आधुनिक मसाज उपकरणांच्या साहाय्याने स्नायूंना आराम, सूज, वेदना व फोडांवर प्राथमिक उपचार तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देत सेवाभावातून आधार देणारी हीच 'चरणसेवा' होय. संत तुकाराम महाराजांच्या सेवाभावाच्या विचारांना आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देत वारकरी परंपरा आणि लोकसेवेचा सुंदर संगम या उपक्रमातून घडविण्यात आला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि सेवाभावी दृष्टिकोनातून 'चरण सेवा' उपक्रम साकार झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देणारा हा एक अभिनव उपक्रम असून, आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देतानाच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न या माध्यमातून होत आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष विविध संस्थांच्या समन्वयातून यंदाही ही चरण सेवा अधिक व्यापक स्वरूपात वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सज्ज असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.